21 MAR 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेतील विजेत्या संघाचे विद्यापीठात स्वागत

प्रतिनिधी
कोल्हापूर,

चेन्नई येथे झालेल्या ८२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथमच सर्वसाधारण विजेतेपद मिळाले आहे. या संघाचे सोमवारी विद्यापीठात उत्साही स्वागत करण्यात आले.

देशातील १७८ विद्यापीठे सहभागी असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील विजेता शिवाजी विद्यापीठाचा विजेता संघ चेन्नईहून थेट विद्यापीठात सोमवारी दाखल झाला. संघातील खेळाडूंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्यास अभिवादन केले. तेथेच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, अधिकाऱ्यांनी विजेत्यांचे स्वागत केले.



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये सर्वसाधारण विजेतेपद मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच ॲथलेटिक्समध्ये सर्वसाधारण विजेतेपद मिळवण्याची कामगिरी करून ग्रामीण भागातील खेळाडूंनी मैदानावरील प्रभुत्व राष्ट्रीय स्तरावर सिद्ध केले आहे.

दरम्यान, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत विद्यापीठ संघाने २ सुवर्णपदकांसह १३ पदके प्राप्त केली. मुलींच्या २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉनमध्ये रेश्मा केवटेने सुवर्णपदक तर १० हजार मीटर धावणेत कांस्य पदक मिळवले. मुलांच्या गटात २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन आणि १० हजार मीटर धावणे स्पर्धांत विवेक मोरेने रौप्यपदके यांच्यासह अन्य खेळाडूंनीही पदके मिळवली आहेत.

तरुण भारत

थोडक्यात महत्वाचे

# अमेरिकेतील बाईटझल परिसंवादासाठी डॉ. चंद्रकांत लंगरे यांना निमंत्रण

**कोल्हापूर :** अमेरिकेतील जेम्स मेडिसन विद्यापीठातील महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने २७ व २८ सप्टेंबरला प्रा. टेरी बाईटझल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित 'बाईटझल परिसंवादासाठी शिवाजी विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांना विशेष निमंत्रित केले आहे. अमेरिकेत होणाऱ्या या परिसंवादात डॉ. लंगरे हे 'महात्मा गांधी ऑन सेल्यूलॉईड' यावर विचार मांडणार आहेत. यासाठी त्यांना जेम्स मॅडिसन विद्यापीठाकडून पंधराशे डॉलर्सचे अनुदान मंजूर झाले आहे. यापूर्वी डॉ. लंगरे यांनी महात्मा गांधी सेंटर फॉर ग्लोबल नॉन–व्हायोलन्स, जेम्स मेडीसन युनिव्हर्सिटी आणि शिवाजी विद्यापीठांच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या जयंती निमित्त गांधी विचार आणि चरित्राचा अभ्यास करणारे दोन खंडीय वैश्विक ग्रंथ प्रा. टेरी बाईटझल यांच्यासोबत संपादित केले आहेत. बाईटझल परिसंवादासाठी त्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे सहकार्य लाभले.

तरूण भारत

# फुलपाखरांसारख्या कीटकांमुळे निसर्गाची विविधता टिकून आहे : बी. यु. भवर

**गारगोटी :** 'फुलपाखरासारख्या कीटकांमुळे निसर्गाची विविधता टिकून आहे. वाढत्या प्रदूषणामुळे अन्य प्राण्यांप्रमाणे फुलपाखरेही धोक्यात आली आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी समाजात जनजागृती करावी'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बी. यु. भवर यांनी येथे व्यक्त केले.

ते येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये अंतर्गत दर्जा हमी कक्ष व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जागतिक फुलपाखरू दिन' प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. एस्सी. विभागाचे समन्वयक डॉ. सागर व्हनाळकर होते.

यावेळी प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने भुदरगड तालुक्यातील फुलपाखरांची जैवविविधता या अंतर्गत फुलपाखरांचे प्रदर्शन आयोजित केले होते. फुलपाखरू दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. एस. आर. पोवार, प्रा. सी. के. चव्हाण, डॉ. एम. एस. देसाई, डॉ. एस. एस. खोपडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्वेता खोत यांनी केले. सूत्रसंचालन ज्योती गुरव यांनी केले. आभार डॉ. विलास जगताप यांनी मानले.

पुण्यनगरी

# राजर्षी शाहू स्मृती माहितीपट महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष महोत्सव २०२२-२३ निमित्त शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम, तसेच उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सवा'चे आयोजन केले आहे. या महोत्सवात महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील. हा महोत्सव दि. २७-२८ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे.

स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला नोंदणी अर्ज, महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, तसेच मेल ड्राईव्हच्या माध्यमातून माहितीपटाची क्लिप मेलद्वारे दि. १७ एप्रिल सायंकाळी ५ वाजेपर्यंत पाठवणे बंधनकारक आहे.

महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचवलेले विषय, नियम, अटी तसेच नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी या महोत्सवाच्या सहसमन्वयक डॉ. सुमेधा साळुंखे आणि परशराम पवार काम पाहत असून, त्यांच्याशी विभागाच्या मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन मास कम्युनिकेशन अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ उपांत्य फेरीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी-२०' क्रिकेट स्पर्धेमध्ये सोमवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठांनी सरासरीच्या बळावर उपांत्य फेरीत स्थान पटकावले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यात झाला. जळगावने हा सामना ५ धावांनी जिंकला. दुपारचा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्यात झाला. या सामन्यात पुणे संघाने विजय मिळवला. मंगळवारी उपांत्य फेरीचे सामने होणार आहेत. यामध्ये मुंबई विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, तर दुसरा सामना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यात होईल. २२ मार्च रोजी तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना सकाळच्या सत्रात, तर अंतिम लढत दुपारच्या सत्रात होईल.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, पुणे, नांदेड संघांची उपांत्य फेरीत धडक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी गुण सरासरीवर उपांत्य फेरीत प्रवेश केला.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा ५ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा पराभव केला. स्पर्धेतील सरासरी गुणांवर शिवाजी विद्यापीठ, पुणे, नांदेड या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. तत्पूर्वीच मुंबई विद्यापीठाचा संघ उपांत्य फेरीत पोहोचला आहे. मंगळवारी उपांत्य फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे.

लोकमत

# विद्यापीठातील सहा परीक्षांसाठी २०६५ विद्यार्थी उपस्थित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण २०६५ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ लॉ, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ आर्किटेक्चर अशा सहा परीक्षांसाठी सोमवारी २०६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या. विद्यापीठाच्या रविवारी आणि सोमवारी बीए, सस्टेनेबल ॲग्रिकल्चर मॅनेजमेंट, नर्सिंग ॲण्ड हॉस्पिटल मॅनेजमेंट, न्यूट्रेशन ॲण्ड डायट, कॅटरिंग ॲण्ड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, अशा १० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.

सकाळ

आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा

# शिवाजी विद्यापीठ, पुणे, नांदेड संघ उपांत्य फेरीत

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. त्यात आज प्रतिस्पर्धी संघांवर मात करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. शिवाजी विद्यापीठ, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संघांनी सरासरीच्या बळावर उपांत्य फेरीत स्थान मिळविले.

स्पर्धेत आज आठव्या दिवशीच्या पहिल्या सामन्यात जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावर पाच धावांनी विजय मिळविला. जळगावचे जितेंद्र पाटील 'सामनावीर' ठरले. दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला पराभूत केले. पुणे संघाने २० षटकांत ६ बाद १५९ धावा केल्या. परभणीचा संघ १३.१ षटकांत सर्वबाद १०९ धावांच करू शकला. पुण्याचे दीपक गजरमल 'सामनावीर' ठरले. दरम्यान, उद्या (ता. २१) उपांत्य फेरीचे सामने होणार आहेत. सकाळी ९ वाजता मुंबई विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात पहिला सामना होईल. दुसरा सामना शिवाजी विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात होणार आहे. तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना गुरुवारी (ता. २३) आणि अंतिम लढत होईल.

तरुण भारत

# कोल्हापुरात आज फार्मा करंडक विभागीय सांस्कृतिक स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत अग्रणी फार्मसी महाविद्यालयांतर्गत कोल्हापूर विभागीय फार्मसी करंडक सांस्कृतिक स्पर्धा मंगळवारी, २१ रोजी केशवराव भोसले नाट्यगृहात होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती डॉ. एच. एन. मोरे यांनी दिली. फार्मा करंडक स्पर्धेसाठी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील १६ फार्मसी महाविद्यालयांतील ६०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. नृत्य, नाटक, समुहगायन आणि मूक अभिनय विभागात ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतून १० विजेते निवडण्यात येणार आहेत. सायंकाळी केशवराव भोसले नाट्यगृहातच बक्षीस वितरण होणार आहे. समन्वयक म्हणून डॉ. एस. जी. किल्लेदार, प्रा. राकेश ढवळे, सुदर्शन खोत काम पहात असल्याची माहिती डॉ. मोरे यांनी दिली.

तरूण भारत

# विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई, नांदेडचे विजय

## राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी–२० क्रिकेट स्पर्धेत सोमवारी सहाव्या दिवशी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई, नांदेडचे विजय नोंदवले. शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या या स्पर्धेत प्राथमिक फेरीत शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांसह मुंबई, नांदेड विद्यापीठांनी विजय नोंदवले.

**मुंबई विद्यापीठ ५५ धावांनी विजयी**

सकाळचा पहिला सामना मुंबई विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात झाला. मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ६ बाद १६४ धावा केल्या. नाशिकच्या संदीप चौधरीने २ बळी घेतले. नाशिक संघाने २० षटकात ९ बाद १०९ धावा केल्या. त्यामध्ये राजेंद्र शहाणेच्या २४ व नंदकिशोर ठाकरेच्या २२ धावा होत्या.

**शिवाजी विद्यापीठ–ब संघाचा लोणेरेवर विजय**

दुसरा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेर आणि शिवाजी विद्यापीठ–ब संघांत झाला. शिवाजी विद्यापीठ–ब संघाने ४ गडी राखून सामना जिंकला. लोणेरे संघाने प्रथम फलंदाजी करताना १९.३ षटकात १० बाद १०८ धावा केल्या. विद्यापीठ–ब संघाने १५ षटकात ६ बाद ११४ धावा केल्या. लोणेरेच्या जितु अंधेरेंनी २ व संतोष हसे यांनी १ गडी बाद केला. अनिल साळुंखे सामनावीर ठरले.

**शिवाजी विद्यापीठ ७ गडी राखून विजयी**

दुपारी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात झालेला सामना शिवाजी विद्यापीठाने ७ गडी राखून जिंकला.

**नांदेड विद्यापीठाचा ४ गडी राखून विजय**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड यांच्यात झालेला सामना नांदेडने चार गडी राखून जिंकला.

नाशिक संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ बाद ८७ धावा केल्या. विजय शार्दूल १९ व देविदास जाधव यांनी १४ धावा केल्या. नांदेडच्या जयराम हंबर्डे व गोविंद सोनटक्के यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. नांदेडने नाशिकचे आव्हान १३.१ षटकात ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. त्यांच्याकडून शिवाजी हंबर्डे यांनी १९ व प्रकाश मोपडे यांनी १७ धावा केल्या.

तरुण भारत

# दहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सोमवारी एमबीए, बी.टेक, एम.टेक., मास्टर ऑफ लॉ, बॅचरल ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ आर्किटेक्चरच्या परीक्षा सोमवारी ऑफलाईन झाल्या. या परीक्षांसाठी २०६५ विद्यार्थी उपस्थित होते.

रविवारी, सोमवारी बीए सेमीस्टर ३, सेमीस्टर, बी व्होकेशनल सुस्टेनेबल ॲग्रिकल्चर मॅनेजमेंट सेमिस्टर १, बी. व्होकेशनल नर्सिंग अँड हॉस्पिटल मॅनेजमेंट सेमीस्टर १, बी व्होकेशनल न्यूट्रीशन सेमीस्टर १, कॅटरींग, हॉस्पिटल मॅनेजमेंट सेमिस्टर १, एम.एस्सी मेडिकल इन्फॉर्म मॅनेजमेंट सेमिस्टर ३, एस.एस्सी. ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट सेमिस्टर १, बी. टेक सेमीस्टर ३, डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्निशियन सेमीस्टर १ अशा १० अभ्यासक्रमांचे निकाल घोषीत झाले.